ISSN 2394-5303

Peer reviewed International Research Journal

# Printing Area

Issue 85, Vol 03, January 2022

Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

January 2022, Issue-85, Vol-03

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# Editorial Board & review Committee


- **Chief Editor**

**Dr Gholap Bapu Ganpat**
Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
9850203295, 7588057695
vidyawarta@gmail.com

- **M.Saleem**

saien Ghulam street
Fatehgarh Sialkot city
Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
saleem.1938@hotmail.com

- **Dr. Momin Mujtaba**

Faculty Member,Dept. of Business Admin.
Prince Salman Bin AbdulAziz University
Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**

115/478, Campus road,
Konesapuri, Nilaveli ( Postal code-31010),
Trincomalee, Sri Lanka
nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**

vikaspadalkar@gmail.com
**Cell.** +91 98908 13228 (India),
+ 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**

Navgan College, Parli –v Dist. Beed
Pin 431126 Maharashtra
Mobi.9421336952
umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**

B-2/8, Sukhwani Paradise,
Behind Hotel Ganesh, Pimpri,
Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**

Post.Warnanagar, Tq.Panhala,
Dist.Kolhapur-4316113
Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**

AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
Mob. No. – 09827983437
jubrajkhamari@gmail.com

MISS. VARSHA ANILRAO TIDKE
FULE-AMBEDKAR COLLEGE OF SOCIAL WORK,
HANUMAN NAGAR, REVENUE COLONY, GADCHIROLI
9421857700
varshaatidke21@gmail.com

- **Dr. Wagh Anand**

Dept. Of Lifelong Learning and Extension
Dr B A M U Aurangabad pin 431004
Mobi. 9545778985
wagh.anand915@gmail.com

- **Dr. Ambhore Shankar**

Jalna,Maharashtra
shankar296@gmail.com
Mobi.9422215556

- **Dr. Ashish Kumar**

A-2/157, Sector-3, Rohini, Delhi -110085
*Ph.no:* 09811055359

- **Prof. Surwade Yogesh**

Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
**Cell No:** +919860768499
yogeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**

At.Post.Saundhane, Near
Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
Mobi. 9923811609
patildipak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**

Vanshree Nagar,Behind Hotel
Dawat, Mantha Road, Jalna-431203
Mobi.9422479302
**patwarivm@rediffmail.com**

- **Dr.Varma Anju**

Assistant Professor, Dept. of Education,
Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
anjuverma2009@rediffmail.com

- **Dr. Dinesh Kumar Charan**

Associate Professor and HOD-History Dept.,
Govt.Lohia College Churu (Rajasthan) India
Pin- 331001
**Mob. No.-9414305804**

40) महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान
प्रा.डॉ. सहदेव विलासराव रसाळ, उस्मानाबाद ||178

41) साठोत्तरी मराठी कवयित्री डॉ. प्रभा गणोरकर
प्रा. डॉ. अरविंद भ. कटरे, साकोली जि. भंडारा (म.रा.) ||183

42) ग्रामीण कविता आणि बोलीभाषा
प्रा. डॉ. मारोती माधवराव घुगे, ता. घनसावंगी जि. जालना ||189

43) बालीवुड संगीत में लक्ष्मीकांत प्यारे लाल का योगदान
निलाक्षी तूली, Jammu ||194

44) भारतीय कला में स्वतंत्र नाग प्रतिमाएँ
रणविजय सिंह, गोरखपुर ||197

45) सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन्
डॉ. मीना शर्मा, शाहजहाँपुर, उ.प्र. ||200

46) बेटी भी माँ की संतान है
डॉ. विनोद कुमारी, मेरठ ||202

47) निराला एवं छायावाद
सूर्य कुमार, ग्वालियर (म.प्र.) ||206

48) गड-कोट संवर्धन काळाची गरज
प्रा अरुण हरिश्चंद्र गंगणे आडस, ता. केज जि. बीड ||210

49) राजस्थान के भीलवाड़ा जिले के प्रमुख स्वतंत्रता सेनानी: जहाजपुर...
सुरेश कुमार मीणा, उदयपुर राजस्थान ||213

50) समस्त ललित कलाओं में संगीत का समावेश
Dr. Mukteshi Sharma ||217

51) बी.एस.टी.सी. के विद्यार्थियों में हितोपदेश की कथाओं के माध्यम से....
डॉ. राजेश कुमार दाधीच, बौंली, सवाई माधोपुर राजस्थान ||219

52) Politics of Uttarakhand and Environmentalism
Ramesh Singh Danu, Meena Pathani, Pushkar Singh Bisht ||227




http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03

40

# महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान

प्रा. डॉ. सहदेव विलासराव रसाळ
सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग,
व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रस्तावना:**

बहुजन समाजात परिवर्तन घडविण्याच्या भूमिकेतून महात्मा फुले यांनी लेखन केले. त्यांचे लेखन मराठी साहित्यात एका वेगळया अंगाने आकारास आले आहे. तत्कालीन मराठी साहित्यातील प्रस्तापित वर्गापेक्षा भिन्न लेखन त्यांनी केले. त्यांच्या साहित्य लेखनाच्या मुळाशी उपेक्षित वर्गाचे प्रबोधन करण्याचा विचार एकवटलेला दिसतो. उच्चवर्णीय मानसिकतेला त्यांच्या साहित्याने कमालीचे हादरे दिले. त्यांच्या साहित्यातून शोषित माणसांची सर्वार्थाने मुक्तता झाली पाहिजे ही प्रेरणा आवतरलेली होती. त्यांनी मराठी साहित्यात विपुल लेखन करून ठेवले आहे. त्यांच्या या साहित्यातील भरीव योगदानाची मांडणी येथे केली जाणार आहे.

**महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान : एक दृष्टीक्षेप**

मराठी साहित्यातील प्रस्थापित मानसिकतेला बगल देऊन एका वेगळया चाकोरीत महात्मा फुले यांनी लेखन केले. त्यांचे साहित्य लेखनाचे प्रयोजन हे तळागाळातील माणसांना जागश्त करण्याचे होते. त्यामुळे तत्कालीन साहित्यक्षेत्रातील प्रयोगशील लेखक म्हणून फुलेंचे स्थान महत्त्वाचे ठरते.

**फुले यांची ग्रंथसंपदा —**

'तृतीय रत्न नाटक' (१८५५), 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा' (१८६९), 'ब्राह्मणांचे कसब' (१८६९), 'विद्याखात्यातील ब्राह्मण पंतोजी' (१८६९), 'गुलामगिरी' (१८७३), 'सत्यशोधक समाजाची तिसऱ्या वार्षिक समारंभाची हकिकत' (१८७६), 'पुणे सत्यशोधक समाजाचा निबंध व वक्तृत्व समारंभ' (१८८९), 'दुष्काळविषयक पत्रक', 'हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन' (१८८२), 'शेतकऱ्यांचा असूड' (१८८३), 'महात्मा फुले यांचे मलबारीच्या दोन टिपणांविषयीचे मत' (१८८४), 'मराठी ग्रंथागार सभेस पत्र' (१८८५), 'सत्सार अंक १, २' (१८७५), 'इशारा' (१८८५), 'ग्रामजोश्यांसंबंधी जाहिर खबर' (१८८६), 'मामा परमानंद यांस पत्र' (१८८६), 'सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजाविधी' (१८८७), 'अखंडादी काव्यरचना (स्फुट)' (१८८७), 'महात्मा फुले यांचे उईलपत्र' (१८८७) आणि 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' (१८९१) इत्यादी साहित्य निर्मिती करून त्यांनी मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले होते. हे त्यांचे मराठी साहित्यातील अजोड योगदानाच म्हणावे लागेल.

फुले यांची लेखनी साहित्यनिर्मिती करून समाजात बदल घडवण्यासाठी धडपडत होती. याचा प्रत्यय आपणास त्यांच्या एकूणच साहित्यावर दृष्टीक्षेप टाकल्यावर येईल. या समाजातील विषमता नष्ट झाली पाहिजे. या भूमिकेतून त्यांनी लेखन केले. त्यांच्या एकूणच साहित्याचे विवेचन करून लोकप्रिय आणि निवडक कलाकृतीवर आपण प्रकाश टाकणार आहेत. त्यापैकी त्यांचे 'तश्तीय रत्न' हे नाटक वाङ्मयीन मूल्यांपेक्षा प्रबोधनाचे मूल्ये घेऊन आकारास आलेले नाटक आहे. या व्यवस्थेतील वरच्या स्तरातील भट जोशी ही मंडळी धर्माच्या धापा देऊन अज्ञानी असलेल्या शूद्रांना कसे लुबाडतात. याचे वास्तवदर्शी दर्शन घडवले आहे. या विषयी डॉ.रवींद्र ठाकूर विवेचन करतात, ''नाटकातला जोशी मोठा लबाड होता. तो एका शेतकरी स्त्रीला सांगत होता की, तुझ्या मुलाचा जन्म तुझ्या नवऱ्याला घातक ठरणार आहे. ते संकट टाळण्यासाठी तू ब्राह्मणभोजन घाल. ती स्त्री त्याच्या कपटाला बळी पडली होती खरी; परंतु ऐनवेळी एक ख्रिस्ती पाद्रीबोवा आल्यामुळे जोशीबुवांची चांगलीच फजिती झाली होती. विदूषक तर फारच गंमत्या होता. तो प्रत्येक वेळी जोशीच्या लबाड्या श्रोत्यांना उघड़ करून सांगत होता. एकदा तो म्हणाला ब्राह्मण इतरांवरचं अरिष्ट दूर करू शकतो, तर स्वत:वरच अरिष्ट का दूर करू शकत नाही? हसून—हसून सर्वांच्या मुरकुंडया वळल्या. तो

शेतकरी आणि त्याची बायको जोतीराव आणि सावित्रीबाई यांनी घातलेल्या रात्रशाळेत यायला निघतात. या शेवटच्या प्रसंगी सावित्रीबाईनाही हसू आवरलं नाही'[१] यावरून 'तृतीय रत्न' या नाटकाची साहित्यातील एक वेगळी ओळख पटण्यास मदत होते. त्यांच्या लेखनात वरकरणी विनोदाची झालर असली तरी मुळात प्रबोधनाची भूमिका दडलेली आहे. फुले यांचे हे नाटक दक्षिणा प्राइझ कमिटीकडे पुरस्कारासाठी पाठवले होते. परंतु तत्कालीन कोत्या मानसिकतेमुळे याचा बहुमान होऊ शकला नाही; हे सर्वश्रुत आहे. अशा असंख्य अनुभवाला सोबत घेऊन त्यांचे लेखन वेगवेगळया वाङ्मयप्रकारातून बहरत गेले.

'छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा' १८६९ मध्ये प्रसिध्द झाला. या पोवाड्याच्या माध्यमातून फुले यांनी शिवछत्रपतींच्या कार्याचा सखोल असा वेध घेतला. शिवाजी महाराजांच्या गुणांचे वर्णन करीत असताना फुलेंनी महाराजांच्या चातुर्य, कर्तबगारी, बुध्दीमत्ता, सावधपणा, उदारता अशा असंख्य अंगावर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या एकूणच पोवाड्यातून शब्दरचना कौशल्ये, रेखीवपणा आणि पोवाडा या वाङ्मया प्रकाराला साजेशी रचना झालेली दिसते. या पोवाड्याविषयी गं.बा.सरदार म्हणतात, ''पवाड्याची सुरूवातच मुळी त्यांनी 'कुळवाडी भूषण पवाडा गातो भोसल्याचा। छत्रपती शिवाजीचा' अशी केली आहे. आणि शेवटच्या कडव्यात 'जोतिराव फुल्यानें गाईला पुत क्षुद्राचा। मुख्य धनी पेशव्याचा' असे म्हटले आहे. 'शिवराजभूषण' व 'शिवबावनी' हे शिवाजीचा गुणगौरव करणारे दोन काव्यग्रंथ लिहिणारा कवी भूषण जातीने ब्राह्मण होता. उलट या पवाड्याचा कर्ता हा 'कुळवाडीभूषण' शेतजमीन कसणाऱ्या समाजाचा प्रतिनिधी आहे, कष्टकरी कुळवाड्यांचा शाहीर आहे, असा त्यांच्या ह्या ओळींचा इत्यर्थ आहे. शिवाजीचा उल्लेख' त्यांनी पराक्रमी शुद्राचा पुत्र व ब्राह्मण पेशव्याचा मुख्य धनी असा केला आहे.''[२] यातून फुलेंची लेखनातील वास्तवला मूखर करणारी दृष्टी प्रत्ययास येते. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य समाजातील दुर्लक्षित वर्गाला समजले पाहिजे. ही मुख्य भूमिका घेऊन त्यांनी लेखन केले. मराठी साहित्यविश्वात एका वेगळ्या धाटणीतून पोवाडा हा वाङ्मयप्रकार रुजवण्यात त्यांचे मौलिक असे योगदान आहे. हे त्यांच्या समृद्ध अशा पोवाड्याच्या लेखनावरून निदर्शनास येते.

फुलेंची साहित्यनिर्मिती ही अधिकांश विशिष्ट हेतूने प्रेरित आहे. त्यांना आपल्या साहित्य निर्मितीच्या माध्यमातून समाजातील बहुतांश मंडळींचे प्रबोधन करायचे होते. शुद्रातिशूद्रांच्या दुरावस्थेची कारण त्यांना आपल्या साहित्यातून मांडायची होती. एकूणच बहुजन समाज हा शिक्षणापासून वंचित राहिला असल्यामुळे तो प्रगती करू शकला नाही. या माणसांच्या मनात शिक्षणाचे स्फुल्लिंग पेटविण्यासाठी फुलेंनी लेखन केले. 'ब्राह्मणांचे कसब' हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ या व्यवस्थेतील ब्राह्मणी मानसिकतेचा वेध घेतो. हा ग्रंथ कुणबी माळी, मांग, महार यांच्या होणाऱ्या अवहेलनेची मांडणी करतो. भट जोशी हे अशिक्षित आणि दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या शुद्रांना धर्माच्या नावाखाली थापा मारून कसे फसवतात. याची मांडणी या ग्रंथातून करण्यात आली आहे. आर्यलोक भारतात येण्यापूर्वी या देशातील जनता सुखी होती. आर्यांच्या आगमनानंतर मूळच्या भारतीयांना त्यांनी गुलाम केले. येथील सर्व धर्म ग्रंथावर त्यांनी आपला प्रभाव निर्माण केला हे सर्व घडवण्याच्या मुळाशी ब्राह्मणी मानसिकता आहे. याचे दर्शन फुलेंनी 'ब्राह्मणांचे कसब' या ग्रंथातून घडवले आहे. भट भिक्षुकांच्या स्वार्थी प्रभावातून येथील सामान्य माणूसही चुकत नाही. त्याला एकूणच धार्मिक विधी करावे लागतात. हे विधी करत असताना भट—ब्राह्मण गरिबांना कसे लुटतात. याची प्रभावी मांडणी प्रस्तुत ग्रंथातून फुलेंनी केली आहे. याबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विवेचन करताना म्हणतात, '''ब्राह्मणांचे कसब' या काव्यसंग्रहात जोतीरावांनी म्हटले की अडाणी व देवभोळे शेतकरी भटा—भिक्षुकांच्या सांगण्याप्रमाणे आपली कौटुंबिक धार्मिक कर्मे करीत असतात. त्यात शेतकऱ्यांची पिळवणूक होते. अलीकडे त्या चालीरीती पुष्कळ कमी झाल्या आहेत. शेतकऱ्याची बायको प्रसूत झाल्यावर भटजी त्याला धार्मिक विधी करण्यास सांगतो. त्यामुळे अपमृत्यू टळेल असे तो म्हणतो. प्रत्येक पोथीत भटला धनलाभ असतो-''[३] ही भट—भिक्षुकांची मानसिकता स्वत:च्या स्वार्थाभोवती केंद्रित

झालेली दिसते. या प्रवृत्तीचा वेध फुलेंनी आपल्या या प्रस्तुत साहित्यकृतीतून घेतला आहे. वेगवेगळ्या विधींच्या माध्यमातून गरीब व अशिक्षित माणसांना लुटणारी भिक्षुकी वृत्ती फुलेंनी येथे टीपली आहे.

'गुलामगिरी' हा त्यांचा ग्रंथ सन १८७३ साली प्रकाशित झाला. धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि अन्य स्वरुपाची गुलामगिरी ही फुलेंना अमान्य होती. यामुळेच त्यांनी अशा ग्रंथांची निर्मिती करून बहुजनांच्या मनात स्वाभिमानाचे बीज रुजविण्याचे काम केले. या ग्रंथात त्यांनी मत्स्य, कच्छ, वराह, नृसिंह, वामन आणि परशुराम यांच्या संबंधीच्या पौराणिक कथा यांची मांडणी करीत आर्य आणि मूळच्या क्षेत्रपती यांच्यातील दीर्घकालीन संघर्षाची मांडणी केली आहे. यात आर्य विजयी झाल्यानंतर त्यांनी तेथील लोकांना गुलामाप्रमाणे वागवणे. महारांना तर त्यांनी अस्पृश्य ठरवून माणुसकीला हरताळ फासणारे हीन निर्बंध लादले. विद्यार्जनाचे दरवाजे कायमचे बंद करण्यात आले या सर्वांची मांडणी 'गुलामगिरी' या ग्रंथातून करण्यात आली आहे. याबद्दल अजित पाटील विवेचन करतात, ''जोतीबांच्या 'गुलामगिरी' या ग्रंथात एकूण सोळा प्रकरणं आहेत. या सोळापैकी नऊ प्रकरणं समाजातील ब्राह्मणी वर्चस्वावर आहेत. त्यात ब्राह्मणांचा समाजातील वर्चस्वाचा इतिहासच दिला आहे म्हणा ना.''[६] यावरून 'गुलामगिरी' या ग्रंथाचा आराखडाच निदर्शनास येतो. या ग्रंथाबद्दलचे एक वेगळे विवेचन धनंजय कीर आणि स.गं.मालशे यांच्या प्रस्तावनेतून समोर येते, ''जोतीरावांचा विचार हा मानवी स्वातंत्र्याकडे व समतेकडे नेणारा विचार होता हे रहस्य त्यांनी निर्माण केलेल्या सत्यशोधक ब्राह्मणेत्तर चळवळीतील नेत्यांना फारच उशिरा उमगले. ''गुलामगिरी'' या त्यांच्या पुस्तकाची अर्पणपत्रिका त्यांचा उद्देश सूचित करते. 'गुलामगिरी'' या पुस्तकाच्या प्रथम आवृत्तीची अर्पणपत्रिका पाहावी. निग्रो गुलामांना मुक्त करण्याकरिता आत्मार्पणपूर्वक आंदोलन, चालविणाऱ्या लोकांना 'गुलामगिरी'' हे पुस्तक त्यांनी अर्पण केले आहे.''[७] यातून फुलेंचे मराठी साहित्यातील योगदान अधोरेखित होतेच पण गरीब आणि दुर्लक्षित माणसांना प्रगतीच्या प्रवाहात आणण्यासाठीची तळमळ निदर्शनास येते. प्रस्थापित व्यवस्थेने नाकारलेल्या माणसांना न्याय मिळवून देण्यासाठी आपले साहित्य समृध्दपणे लिहिणारे फुले मराठी साहित्यातील कर्ते सुधारक ठरतात.

'शेतकऱ्याचा असूड' हा फुलेंचा सुप्रसिध्द ग्रंथ सन १८८३ मध्ये प्रसिध्द झाला. त्यांच्या या ग्रंथाने शेतकऱ्यांची व्यथा–वेदना एका वेगळ्या पातळीवरून मांडली आहे. त्यांचा हा ग्रंथ मराठी साहित्यक्षेत्रात एक मौलिक ग्रंथ म्हटले तरी वावगे ठरू नये. एवढ्या उंचीचा आहे हे कोणालाही नाकरता येणार नाही. हा ग्रंथ वर्णनात्मक पातळीवरून साकार झाला असला तरी फुलेंची लेखनी तिखट धारदार आहे. याचा प्रत्यय या एकूणच ग्रंथातील लेखन शैलीवरून येतो. शेती आणि शेतीविषयक प्रश्न येऊन हा ग्रंथ आकारास आलेला आहे. शेतकऱ्याच्या वाट्याला आलेल्या दैन्यावस्थेच्या मुळाशी असंख्य कारणे आहेत. या सर्वांची उकल फुले प्रस्तुत ग्रंथातून करताना दिसतात. या अनुषंगाने विवेचन करताना डॉ.नागनाथ कोत्तापले म्हणतात, ''शेतकऱ्याचा असूड' हा महात्मा फुले यांचा अतिशय महत्त्वाचा ग्रंथ होय. आतापर्यंतच्या एकूण भारतीय परंपरेत शेतीचा एवढ्या गंभीरपणे कुणी विचारण केला नव्हता. फुल्यांच्या समकालीन सुधारकांनाही कधी शेतीबद्दल, शेतकऱ्याबद्दल विचार करावा असे वाटले नाही. या देशातील एकूण परंपराच अशी की पुस्तकी शाब्दिकक् ग्रामीण जनता तिचे प्रश्न, त्यांची दु:खे यांना प्रथमत:च वाचा फुडली ती महात्मा फुल्यांच्या रुपानेच.''[८] ही फुलेंची ग्रामीण शेतकऱ्याबद्दलची बांधिलकी या लेखनातून समोर येते. आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेलाच शेतकरी असा नागवला जातो. त्याची व्यथा आपल्या लेखनातून मांडण्याच्या भूमिकेतून हा ग्रंथ त्यांनी लिहिला. याबद्दल मनोहर पाटील विवेचन करतात, 'जोतीबांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' लिहून शेतकऱ्यांचे दु:ख वेशीवर टांगले. शेतकरी कराच्या ओझ्याखाली कसा दबून गेला आहे याचे निर्भीड चित्रण त्यांनी केले. ब्राह्मण अधिकारी शेतकऱ्याची डाळ शिजू देत नाहीत. गोरे अधिकारी विलासात गुंग असतात. त्यामुळेच ब्राह्मण अधिकाऱ्याचे फावते आणि ते शेतकऱ्यावर मन मानेल तसा जुलूम करतात. कुळकर्णी कज्जेदलालांची भूमिका वठवितात. मामलेदार त्याला खाऊन ढेकर देतात. ब्राह्मण, जोशी, उपाध्ये

धर्माच्या नावावर पाळण्यापासून थडग्यापर्यंत शेतकऱ्याचा पिच्छा पुरवितात. जोतीरावांनी शेतकऱ्याच्या दुःखमय जीवनाचे असे हुबेहुब चित्र रेखाटले आहे.''[७] यावरून फुलेंची शेतकऱ्यांविषयीची आस्था लक्षात येते. शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेले संघर्षमय जगणे एका वेगळ्या पातळीवरून सदर ग्रंथातून मुखर केले आहे. फुलेंच्या लेखनाच्या मुळाशी सतत वास्तवाचे भान असलेले दिसते.

'सत्सार' हे नियतकालिकांचे १ व २ अंक फुलेंनी सन १८८५ ला प्रकाशित केले. या अंकाच्या माध्यमातून भिन्न जातीतील स्त्री—पुरूषांच्या संबंधातून जन्मलेल्या संततीचे प्रश्न मांडले आहेत. आपल्या समाजाची अशा संततीकडे पाहण्याची दृष्टी कशी कलुशित आहे, याबद्दलचे परखड मत व्यक्त होताना दिसते. ब्राह्मो समाज व प्रार्थना समाज यांच्या शिकवणीतील आणि कृतीतील फरक याची मांडणी येथे फुले करतात. पंडिता रमाबाई आणि ताराबाई शिंदे या दोन स्त्रियांच्या लेखन कारकीर्दीबद्दल फुलेंना कमालीची आपुलकी वाटते. त्यांच्या विचारांचे खंडण न करता व्यक्तिगत पातळीवरून टीका करणाऱ्या पुरूषी मानसिकतेचे फुले कडाडून वाभाडे काढतात. या दोन्ही अंकातून फुलेंनी वेगवेगळे विषय हाताळले आहेत. याबद्दल भास्कर लक्ष्मण भोळे विवेचन करतात, ''रोटी—बेटीसंबंध जातीय विषमतेचा परिपोष करण्यासाठी वापरणाऱ्या समाजांनी त्यांचा वापर स्त्री—पुरूष विषमता बळकट करण्यासाठीही केलेला आढळतो. स्वजात्र्यंतर्गतच विवाह व्हावेत असा कटाक्ष असणाऱ्या समाजांतही अनुलोम विवाहाला मात्र मुभा असते. कारण त्यातून समुहांच्या उतरंडीला बाधा येत नाही आणि शिवाय पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांचे गौणत्वही त्यातून प्रस्थापित होते.''[८] यातून फुलेंच्या लेखनात असलेला प्रबोधनपर विचार समजण्यास मदत होते. त्यांनी अशा वेगवेगळया विषयावर लेखन करून मराठी साहित्याला समश्ध्द केले. हे त्यांचे मराठी साहित्यातील योगदान खूप महत्त्वाचे आहे. मराठी साहित्याला एक वेगळा आयाम प्राप्त करून देण्यात फुलेंचा मोठा वाटा आहे. आपल्या व्यवस्थेतील एक मोठा वर्ग साहित्याच्या वर्तुळापासून दुर्लक्षित होता. या माणसांना आपल्या लेखनाच्या माध्यमातून बोलके करण्याचे अतिशय महत्त्वाचे काम फुलेंनी केले. त्यांच्या 'सत्सार' या नियतकालिकाने दुर्लक्षित विषयांना न्याय देता देता एका वेगळयाच विश्वाचा परिचय करून दिला आहे. याचा प्रत्यय आपणास फुलेंच्या दोन्ही अंकावरून प्रकर्षाने येत राहतो.

'सार्वजनिक सत्यधर्म' हा त्यांचा ग्रंथ त्यांच्या मश्त्यूनंतर १८९१ साली प्रकाशित झाला. या ग्रंथातून फुलेंनी हिंदू धर्मसंस्थेवर कडाडून हल्ला चढवला आहे. आपल्या सभोवताली असलेल्या स्वार्थी प्रवृत्तीचा त्यांनी खरपूस असा समाचार या ग्रंथाच्या माध्यमातून घेतला आहे. पूजाअर्चा, जपजाप्य, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, दानधर्म, नामस्मरण या भोवती फिरणाऱ्या मानसिकतेचा वेध येथे फुले मोठ्या समर्थपणे घेतात. हा ग्रंथ लिहित असताना पक्षाघाताने उजवा हात निकामी झाला असतानाही डाव्या हातांनी सदर ग्रंथ फुलेंनी लिहिला. ही वाखणण्याजोगी लेखनातील जिद्द बाळगणारे लेखक फुलेंच्या व्यक्तिमत्त्वात सापडतात. त्यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्म' मधील परखडता बहुजन समाजाच्या डोळ्यात अंजन घालणारी आहे. याबद्दल विवेचन करताना पंढरीनाथ सिताराम पाटील म्हणतात, ''म.फुले हे कोणत्याही धर्माकडे सहानुभूतीने पाहात व त्यांतील चांगल्या गोष्टी कबूल करीत. परधर्मातील चांगल्या गोष्टी कबूल करावयास काही सूज्ञ देखील हट्ट धरतात तर कित्येक भितात. परंतु महात्माजी या बाबतीत मोठे निर्भीड होते. परधर्मातील गुणांना जसे ते पहात तितकाच किंबहुना त्याहिपेक्षा जास्त कडकपणानें ते त्यांतील फाजीलपणाचा निषेध करीत. हे म.फुलें यांचे ''सावर्जनिक सत्यधर्म'' पुस्तक वाचल्याने कोणासही कळून येईल.''[९] यावरून फुलेंच्या लेखनविषयक भूमिकेचा परिचय होतो. समाजातील उपेक्षित माणसांची बाजू घेऊन त्यांनी आले लेखन केले.

मराठी साहित्य एका वेगळया अंगाने समश्ध्द करणारे लेखक अशी ओळख फुलेंची तयार झाली होती. त्यांनी मराठी साहित्यातील चाकोरीबध्द लेखनाला बगल देऊन स्वतःची अशी लेखनशैली निर्माण केली होती. त्यांनी मराठीतून विपुल असे लेखन करून मराठी साहित्य वर्तुळात एक वेगळा चेहरा प्राप्त करून

दिला होता. त्यांच्या एकूणच लेखनाबद्दल विवेचन करताना भास्कर चंदनशिव म्हणतात, ''छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा, ब्राह्मणांचे कसब, सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टके, अखंडादी काव्यरचना, शुद्रातिशूदांस उपदेश, आदिसत्याच्या आरत्या, विद्याखात्यांतील ब्राह्मण पंतोजी, भट कामगार इंजिनिअर खात्यात कशी पेंढारगर्दी करतात याविषयी पवाडा, काही काव्यात्म पत्रे आणि प्रसंगोपात स्फुट काव्य इ. लेखन जोतीरावांनी पद्याच्या रूपातून केलेले आहे.''[१०] यावरून फुलेंनी मराठी साहित्यात दिलेल्या भरीव योगदानाचा परिचय घडतो. आपल्या एकूणच आयुष्यात प्रबोधनपर लेखनावर फुलेंनी विशेष भर दिला होता. याची प्रतीती त्यांच्या साहित्यावर दृष्टिक्षेप टाकल्यानंतर सहजगत्या येतो. मुळ्यात फुलेंचे व्यक्तिमत्त्व परिवर्तनाच्या चळवळीत घडलेले असल्यामुळे तो प्रभाव त्यांच्या साहित्यातून स्त्रवत असताना दिसतो.

**समारोप आणि निष्कर्ष :**

महात्मा फुले हे मराठीतील परिवर्तनवादी विचारधारा समृध्द करणारे महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांनी मराठी साहित्यासाठी भरीव असे योगदान दिले आहे. याची मांडणी त्यांच्या बहुविध साहित्यकृतींच्या आधारे येथे करण्यात आली आहे. त्यांच्या लेखनाच्या मूळाशी असलेला प्रबोधनाचा धागा, यानिमित्ताने अधिक गडद झालेला दिसतो. फुलेंचे मराठी साहित्यातील योगदान यासंदर्भात आढावा घेत असताना काही निष्कर्ष हाती आले ते असे आहेत.

१. समकालीन वास्तवाची थेट अभिव्यक्ती म. फुले गद्याप्रमाणेच पद्यातूनही करतात.

२. म.फुलेंनी त्यांच्या बहुआयामी लेखनाच्या माध्यमातून मराठी साहित्य समृध्द केले.

३. मराठी साहित्याला शहरातील उच्चवर्णीय पांढरपेशा वर्गापासून खेडयातील शेतकऱ्यांपर्यंत आणि कामगारापर्यंत फुलेंनी पोहोचवले.

४. म.फुलेंची वाङ्मयनिर्मिती ही शुद्रातिशुद्रांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि प्रबोधन घडवून आणण्यासाठी आग्रही असलेली दिसते.

५. मराठी मातीशी एकरूप असलेली भाषा आणि माणसे फुलेंच्या साहित्यातून साकार झाली आहेत.

६. म.फुलेंच्या साहित्याने प्रस्थापित व्यवस्थेला नाकारून समताधिष्ठित व्यवस्थेचा पुरस्कार केला.

७. मराठी साहित्यातून म.फुलेंनी धर्मव्यवस्थेची आणि त्यातील ढोंगीवरत्तीची निर्भिडपणे चिकित्सा केली आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**

१. डॉ.रविंद्र ठाकूर — महात्मा जोतीराव फुले यांची चरितकहाणी महात्मा, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, प्रथमावरत्ती : ऑक्टोबर १९९९, पृ.क्र.१०६

२. गं.बा.सरदार — महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती: जून १९८१, पृ.क्र.८८

३. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी — जोतिचरित्र नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, पहिली आवृत्ती : १९९२, पृ.क्र.२२.

४. अजित पाटील — खरा महात्मा जोतीबा, सायन पब्लिकेशन्स प्रा.लि.पुणे, प्रथमावृत्ती: २००८, पृ.क्र.५१

५. धनंजय कीर आणि डॉ.स.गं.मालशे (संपा.)— महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवरत्ती : नोव्हेंबर २००६, पृ.क्र.प्रस्तावना (चौदा)

६. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले — जोतिपर्व, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीयावृत्ती : ५ सप्टेंबर २०१०, पृ.क्र.४३.

७. मनोहर पाटील — फुले आंबेडकरी चळवळीचे क्रांतिशास्त्र, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती: जून २०१०, पृ.क्र.७

८. भास्कर लक्ष्मण भोळे — जोतीरावांची समता — संकल्पना, लोकवाङ्मय गृह, मुंबई, चौथी आवृत्ती : नोव्हेंबर २००५, पृ.क्र.२७

९. पंढरीनाथ सिताराम पाटील — महात्मा जोतिराव फुले, मनोविकास प्रकाशन, पुणे, सुधारित आवृत्ती : एप्रिल २००५, पृ.क्र.१४२.

१०. भास्कर चंदनशिव — जोती म्हणे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, नवीन आवृत्ती : २००७, पृ.क्र.१७

□□□